पानसे सर लेख

महाराष्ट्र शासनाचे मंत्रालय, म्हणे आता,शिक्षणविषयक श्वेतपत्रिका काढणार आहे; आणि ती पुढील पावसाळी अधिवेशनात विधीमंडळात मांडणार आहे. श्वेतपत्रिक म्हणजे धोरणविषयक पायाभूत बदल करण्याची व त्यासाठी मानसिक व व्यावहारिक बदल करण्याची तयारी करणे होय.धोरण बदलायला मूळ धोरण काहीतरी असावे लागते. पण गेली कित्येक वर्षे, लिखीत स्वरूपाचे, दीर्घकालाला गवसणी घालणारे,समाजाचे मानस आणि गरजा प्रतिबिंबीत करणारे,आखीव–रेखीव शिक्षणविषयक धोरणच अस्तित्वात नाही. शिक्षणाचा सारा कारभार हा शिक्षणाला दुय्यम – तिय्यम महत्व देऊन, बदलत्या मंत्र्याची बदलती मनमानी आणि सचिवांपासून उगम पावणारी नोकरशाहीची टिकाऊ अरेरावी यांनी बरबटलेला आहे. उदाहरणे अनेक आहेत. वानगीदाखल अलीकडची काही उदाहरणे घेता येतील.

''१ एप्रिल २०१० ''रोजी बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा –२००९'' देशभर लागू झाला. कायद्यात म्हटले होते की,राज्य शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातील अनुभव व तज्ञता असलेल्यांची सल्लागार समिती नेमावी, या समितीने कायद्याच्या अंमलबजावणीची सूत्रे व नियमावली तयार करावी, प्रत्येक निर्णय विधीमंडळापुढे आणावा इत्यादी. पण यातले काहीही न घडता,शिक्षणखात्याने एकापाठोपाठ 'शासननिर्णय' शिक्षणखात्याच्या अखत्यारीत नि सचिवांना सुचतील तसे,मंत्र्यांना मानवतील तसे आणि प्रत्यक्षपणे शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा आणि भवितव्याचा विचार पुरेसर गंभीरपणे न करता,काढायला सुरवात केली. १९ जुन २०१० ला तर असा शासननिर्णय निघाला की,चालू असलेल्या परवानगीचे सर्व सोपस्कार पार पडलेल्या हजारो मराठी शाळांना एका धमक्या फटक्यात 'अनधिकृत' ठरविण्यात आले. अत्यंत बेकायदेशीर असा हा निर्णय होता. लगेच अधिकारी चेतावले आणि मराठी शाळांना धमक्या देणे, दंड ठोठावणे,तुरूंगात टाकणे,पैशांची मागणी करणे अशा कारवायांना ऊत आला. या पत्रकाने मराठी शाळांचा गळा आवळताना इंग्रजी शाळांना तपासणी न करताच मुक्त परवाने वाटले. महाराष्ट्रात मराठी शाळा टिकवण्याचे वाढविण्याचे, जोपासण्याचे धोरण असायचे की या शाळा बंद करण्याचे? यालाच मनमानी नि

अरेरावी कारभार असे म्हणतात. याविरूध्द मराठी शाळा संघटित झाल्या,त्यांच्या 'शिक्षणहक्क समन्वय समिती'ने उपोषणापर्यंत मजल मारली. शिक्षणमंत्र्यांनी हे पत्रक स्थगित करण्याचे आश्वासन देऊन उपोषण मागे घेण्यास भाग पाडले. सरकारने आपले आश्वासन पाळले नाही. नव्या वर्षात मराठी शाळांबाबतचा अधिकाऱ्यांचा छळवाद चालूच राहिला.

सरकार गेली कित्येक वर्षे मराठी शाळांसाठी 'बृहत आराखडा' तयार करीत होते,म्हणे! आता तो तयार झाल्याचे सांगण्यात आले. चालू खाजगी मराठी शाळांना यात समाविष्ट केले जाईल असे आश्वासन शासनाने दिले होते. तसे काही न करता,आता सरकार म्हणते,आहे की, महाराष्ट्रात आणखी पन्नासेक शाळांचीच गरज आहे आणि त्या आम्हीच काढू!'' हा आराखडा हे एक थोतांड आहे. फक्त मराठी शाळांसाठीच अराखडा का?इंग्रजी शाळांसाठी का नाही? सरकारच्या मते फारशा नव्या शाळांची गरज नाही तर मग सरकारने हजारो 'अनधिकृत' ठरविलेल्या मराठी शाळांत जाणारी मुले कोण? कर्नाटकची की गुजरात, मध्यप्रदेशची? मराठी पालकांच्या स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा शासनाला अधिकारच काय? १९ जून २०१० चे पत्रक मागे घेण्यात नेमकी कुणाची प्रतिष्ठा आड येते आहे? इंग्रजी शाळांसाठी बृहत आराखडा कधी करणार?

सरकार मराठी शाळांसाठी कायदा आणणार होते गेल्या वर्षीच्या पावसाळी अधिवेशनात. त्याचे प्रारुप अजूनही तयार नाही. आत्ता या चालू अधिवेशनात, स्वयंसहाय्यित मराठी शाळांसाठीच्या स्वतंत्र कायद्याच्या निर्मितीला मंत्रिमडळाने मान्यता दिली. पण हे विधेयक अधिवेशनात उभे केलेच नाही. आता म्हणे, त्याचा समावेश नव्याने तयार होण्याच्या श्वेतपत्रिकेत असणार आहे. विलंब नि टाळाटाळ हेच या सरकारचे गेल्या कित्येक वर्षाचे तथाकथित शैक्षणिक धोरण राहिलेले आहे. आपण मात्र शिक्षणक्षेत्रात समाजहिताला प्राधान्य देऊन काही घडेल, याची वाट पहात राहू या!

अलीकडे सरकारने दमदारपणे शाळांची पडताळणी केली. अनेक विद्यार्थ्यांची खोटी नोंदणी आढळली, सहाजिकच अनेक शिक्षकांची नेमणूकही खोटी ठरली. मोठा भ्रष्टाचार झाला. महाराष्ट्र शासनाने यावर अजून काहीही केले नाही. तिकडे बिहारमध्ये अशा

खोट्या तीनशेहून अधिक शिक्षकांना, मुख्याध्यापकांना त्वरीत निलंबित केले. महाराष्ट्र शासनाचा कारभार ’ विलंबित असतो हेच खरे.

शासनाच्या संकल्पित श्वेतपत्रिकेत काय असणार आहे, कोण ती तयार करणार आहे हे अजून कळलेलेल नाही. परंतु सरकारी शिक्षणखाते ही श्वेतपत्रिका तयार करणार असेल तर मग तेच ते नि तेच ते अशीच अपेक्षा करावी लगेल. मलमपट्टी होईल,जखमा मात्र बऱ्या होणार नाहीत, चिघळतच राहतील. वास्तविक आज गरज आहे ती महाराष्ट्रातील शिक्षण संबंधित नागरिकांनी एकत्र येऊन जनतेची आपली श्वेतपतिका तयार करण्याची.!